**अर्जदा**रा तर्फे साक्षीदार क्र.२
माझे नांव :– डॉ. श्रीराम रामकिशन तांदळे,
वय :– ४८ वर्ष व्यवसाय :– वैद्यकीय सेवा.
रा.:– नळेगाव, ता. चाकूर जि. लातूर

**अर्ज**दारा तर्फे **साक्षीदार क्र.२** पुढील सर तपास त्यांचे विधीज्ञ श्री एन.बी. बद्दे यांच्या मार्फत **शपथे**वर सुरु:–

१. बाबुराव अमृता गुरव हे माझ्याकडे आले होते. बाबुराव हे नळेगाव येथील रहीवाशी आहेत. बाबुराव यांना व्हायरल इंफेक्शन झाले होते म्हणून ते माझ्याकडे तपासणीकरीता आले होते. मी त्यांना ओपीडी बेसेस वर उपचार देऊन त्यांना विश्रांती घेण्याकरीता सांगितले आणि औषध गोळया लिहून दिले. मी त्यांना दि. ०७.०५.२०१६ रोजी वैद्यकीय प्रमाणपत्र दिले होते. आता मला कागदपत्रांची यादी नि.क्र. ४/२ वर दाखल केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र दाखविण्यात आले, त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही व शिक्का आहे. त्यास नि.क्र. ६४ देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**गैरअर्जदारातर्फे उलटतपास** विधीज्ञ श्री. एस.डी. शिवपुरकर यांच्या मार्फत **शपथे**वर सुरु :–

२. माझ्याकडे रिसेप्शनिस्ट / नोंदणी कक्ष याची सोय नाही. रुग्णाच्या नावाची नोंद करण्यासाठी माझ्याकडे रजीस्टर उपलब्ध नाही. बाबुराव हे माझ्याकडे दि.०२.०५.२०१६ रोजी आले होते. बाबुराव यांची रक्त, लघवी वैगरे तपासणी मी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०२.०५.२०१६ रोजी नंतर बाबुराव माझ्याकडे आले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, बाबुराव माझ्याकडे

अडमीट नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ६४ वर खाडाखोड आहे आणि त्या ठिकाणी माझी सही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र. ६४ वरील खोटे प्रमाणपत्र बाबुराव यांना दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, बाबुराव माझ्याकडे तपासणीकरता कधीही आलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, बाबुराव यांच्या अर्जाला पुष्टी मिळावी म्हणून मी खोटे प्रमाणपत्र दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ६४ वरील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.

DIVYA Digitally signed by DIVYA Date: 2026.06.19 13:07:47 +0530

ठिकाण :- चाकूर ( दिव्या सारंग करभाजन )

दिनांक :- १९/०६/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

चाकुर